NATIONAL RURAL HEALTH MISSION

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, अलिबाग - रायगड

## पदभरती जाहिरात.

दि.०५/०५/२०२१

बेटी बचाओ
save the girl child

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेली पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने दि. ०५/११/२०२१ रोजीपर्यंतच्या कालावधी करीता खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती च्या अधीन राहून पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यानुसार रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | संवर्गाचे नाव (स्टाफ नर्स व एलएचव्ही) | शैक्षणिक अर्हता | पद मंजुर असलेल्या कार्यक्रमाचे नाव | मानधन प्रति महिना | एकुण पदे | जात निहाय पदांची संख्या (आरक्षण) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | 4 | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | स्टाफ नर्स | GNM / B.Sc. Nursing | IPHS | 20000/- | 9 | अ.जा. - ८, अ.ज. - १०, वि.जा.अ. -३, भ.ज.ब.- २, भ.ज.क. -४, भ.ज.ड. -२, वि.मा.प्र-२, इ.मा.व. -५, EWS - ७, अराखीव (खुला). -३२ | अनुभवास प्राधान्य |
| २ | स्टाफ नर्स | GNM / B.Sc. Nursing | Dialysis IPHS | 20000/- | 13 | | अनुभवास प्राधान्य |
| ३ | स्टाफ नर्स | GNM / B.Sc. Nursing | Non Tribal | 20000/- | 11 | | अनुभवास प्राधान्य |
| ४ | स्टाफ नर्स | GNM / B.Sc. Nursing | SUMAN | 20000/- | 6 | | अनुभवास प्राधान्य |
| ५ | स्टाफ नर्स | GNM / B.Sc. Nursing | L2 | 20000/- | 21 | | अनुभवास प्राधान्य |
| ६ | एल.एच.व्ही. | GNM / B.Sc. Nursing | Non Tribal | 20000/- | 1 | | अनुभवास प्राधान्य |
| ७ | स्टाफ नर्स | GNM / B.Sc. Nursing | DEIC | 20000/- | 1 | | अनुभवास प्राधान्य |
| ८ | स्टाफ नर्स | GNM / B.Sc. Nursing | SNCU | 20000/- | 1 | | अनुभवास प्राधान्य |
| ९ | स्टाफ नर्स | GNM / B.Sc. Nursing | KMC | 20000/- | 4 | | अनुभवास प्राधान्य |
| १० | स्टाफ नर्स | GNM / B.Sc. Nursing | NBSU | 20000/- | 8 | | अनुभवास प्राधान्य |

Scanned with CamScanner

❖ *अटी व शर्ती -* पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती दि. ०५/११/२०२१ पर्यंत राहील. पदासाठी पात्र

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती दि. ०५/११/२०२१ पर्यंत राहील. पदासाठी पात्र
उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची ... रिक्त पदे भरेपर्यंत दिनांक १२ व २५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वा.
महिला उमेदवारांनी रिक्त पदे भरेपर्यंत दिनांक १२ व २५ शासकीय सुट्टी अथवा कार्यालय बंद असल्यास ) पुढील दिवशी
या वेळेत (प्रत्येक महिन्याच्या १२ व २५ शासकीय सुट्टी उपस्थित राहणेचे आहे. या पदासांठी अर्ज मा. मुख्य
अर्ज, मुळ कागदपत्र व छायांकित केलेल्या प्रतीसह उपस्थित राहणेचे आहे.
अर्ज, मुळ कागदपत्र व छायांकित केलेल्या प्रतीसह यांच्या नावे सादर करावा.
कार्यकारी अधिकारी, राजि.प. अलिबाग यांच्या नावे सादर करावा.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा व उमेदवाराची निवड झालेनंतर नियुक्ती आदेश प्राप्त झालेनंतर उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सकांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल याशिवाय निवड झालेनंतर संबधित पदावर हजर होताना उमेदवाराने वर्तणूकीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

६) जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. सदर बाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी रा.जि.प. अलिबाग यांनी राखून ठेवले आहेत.

७) मुलाखतीस उपस्थित राहताना उमेदवारास एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

८) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, रा.जि.प. अलिबाग यांचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

९) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. तसेच मेरिट लिस्ट तयार करताना पात्र उमेदवारांच्या आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाचे गुण + उच्च शैक्षणिक अर्हतेचे गुण + NHM, शासकिय संस्था, विभाग, शासन अंगीकृत संस्था यांचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन गुणवत्ता यादी तयार करणेत येईल.

१०) या पदाकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करणेत आलेली आहे. पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापुर्वी त्यांची जिल्हा स्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात येईल. व सदर चाचणी मध्ये उमेदवार पात्र ठरलेनंतर त्यास नियुक्ती आदेश देण्यात येतील. कौशल्य चाचणी मध्ये उमेदवार अपात्र ठरल्यास पुढील पात्र उमेदवारास कौशल्य चाचणी करीता बोलावण्यात येईल.

११) मा. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील पत्र क्र.राआसोम/पदभरती/११६८२-७९२/२०२० दि.२१/०५/२०२० मधील मार्गदर्शक सुचनांनुसार जाहिरातीत नमुद केलेल्या विशिष्ट मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर गुणानुक्रमे सर्वात वर असणाऱ्या इतर कोणत्याही मागास प्रवर्गाच्या उमेदवाराची निवड करणेत येईल एकही मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसलेस खुल्या प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करणेत येईल.

१२) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद् करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१३) वयोमर्यादा :- १८ वर्षे वय पूर्ण करीत असलेले उमेदवार अर्ज करु शकतात. अभियान अंतर्गत सेवाप्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुला प्रवर्ग ३८ वर्ष, राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरिता कमाल सेवा प्रवेश ५ वर्षापर्यंत शिथिल राहील , तसेच सदर पदे आरोग्य सेवेशी निगडीत असलेने वयोमर्यादा ६५ वर्षे राहील.

Scanned with CamScanner

१४) पात्र उमेदवारांनी ४ था मजला, राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग येथे दिनांक १२/०५/ २०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता उपस्थित रहावे. जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्येच अर्ज सादर करावेत. खाली नमुद आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे - १) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे २) संबंधित पदाकरीता तत्सम कौन्सिलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. ३) शाळा सोडल्याचा दाखला / जन्मतारखेचा दाखला ४)अनुभवाची प्रमाणपत्रे ५) पासपोर्ट आकाराचे २ फोटो ६) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र ६) वयाबाबतचा पुरावा ७) सर्व शैक्षणिक वर्षांच्या मार्कलिस्ट

१५) उमेदवाराच्या नावात बदल झाला असलेस त्याबाबतचे शासनाचे राजपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६) जाहिरातीत स्टाफ नर्स व एल.एच.व्ही. पदांकरीता प्रत्येक महिन्याच्या दि.१२ व दि.२५ तारखेस कौशल्य चाचणी व मुलाखती आयोजित करणेत येतील याची नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च: जाहिरात प्रसिध्द केली जाणार नाही. सदर पदांकरीता उमेदवारांनी अर्ज चौथा मजला, राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, रायगड जिल्हा परिषद अलिबाग येथे सादर करावेत

दिनांक :- ०५-०५-२०२१
ठिकाण :- अलिबाग

सदस्य सचिव
निवड समिती
तथा,
जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

05/5/21
डॉ.किरण पाटील, (भा.प्र.से.)
अध्यक्ष,निवड समिती
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

Scanned with CamScanner